# वाशिम जिल्हा पोलीस गॅझेट
## अंक १२ वा
## दिनांक -२०/०३/२०१७ ते २५/०३/२०१७
## पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम.
जावक क्रमांक 3497 दिनांक 9 MAY 2017

---

## भाग- १ :- बदली/पदोन्नती/नेमणुक :-
### बदली:-
आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/पोउपनि ते सपोउपनि पदो/वाढवे- २०१७/२५५५ वाशिम दिनांक २३/३/२०१७ अन्वये मा.पोलीस महासंचालक म.रा.मुंबई यांचेकडील पोमसं/४/१०/७/पोउपनि ते सपोउपनि पदोन्नती/१०/२०१६ दिनांक ७/१/२०१७ अन्वये नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक श्री.अजयकुमार विठ्ठलराव वाढवे यांना त्यांनी कार्यभार ग्रहण केल्याचे दिनांका पासुन सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यातआली असुन पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना अमरावती परीक्षेत्रात करण्यात आल्याने पोलीस सहाआयुक्त ठाणे शहर यांनी त्यांना दिनांक ६/३/२०१७ रोजी कार्यमुक्त केले आहे. त्यानुसार पोउपनि अजयकुमार वाढवे हे दिनांक २०/३/२०१७ रोजी अमरावती परीक्षेत्रीय कार्यालयात हजर झाले आहेत. मा. विपोमनि अमरावती यांचे आदेशान्वये पोलीस उपनिरीक्षक श्री.अजयकुमार विठ्ठलराव वाढवे हे दिनांक २३/०३/२०१७ रोजी पदोन्नतीवर सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी वाशिम जिल्हयात हजर झाले आहेत. त्यांना हजर करुन घेण्यात आले असुन त्यांची तात्पुरती नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा वाशिम येथे करण्यात येत आहे.

### पदोन्नती/नेमणुक :- निरंक.
## भाग-२ रजा.
आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/अ.र.रोखीकरण/पो.अधिकारी/२०१७/२५६८ वाशिम दिनांक २४/३/२०१७ अन्वये सपोनि आर.जी.शेख पो.स्टे.जऊळका यांना १५ दिवस अर्जित रजा प्रत्यार्पीत करुन रोखीकरण करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी नांव/ नेमणुक | रजेचा तपशिल | मुळ वेतन+ग्रेड पे |
|---|---|---|---|
| ०१ | सपोनि आर.जी.शेख पो.स्टे.जऊळका | १५ दिवस अर्जित रजा प्रत्यार्पीत करुन रोखीकरण | १३४५०+४४००/- |

आदेश क्रमांक पोअवा/आली-३/पोहवा-८७५/सिक-हजर/२३५५/२०१७ वाशिम दिनांक १४/०३/२०१७ अन्वये पोहवा/८७५ गजानन कोल्हे नेमणुक पो.स्टे.वाशिम शहर यांनो आपल्या मार्फतीने दिनांक १४/३/२०१७ रोजी मा.नंतर पासुन सिक मधुन कर्तव्यावर हजर करुन घेण्यात आले आहे त्यांचा दि.२/१/२०१७ ते १४/०३/२०१७ पावेतो ७८ दिवसाचा सिक कालावधिचा कार्यकाळ परावर्तीत रजा म्हणुन मंजुर करण्यात येत आहे.

## भाग -३ :- बढती/पगार.- निरंक.

## भाग -४ :- बक्षिस:- निरंक.

## भाग -५ :- शिक्षा/परवानगी :-निरंक.

## भाग -६ :- निलंबन/प्रशिक्षण व इतर :-

## निलंबन :-निरंक.

## प्रशिक्षण :-

आदेश क्रमांक पोअवा/आशा-४/DRIVER-प्रशिक्षण/निवड/नापोकॉ/८६८/२०१७/१०० वाशिम दिनांक १९/०३/२०१७ अन्वये MIAपुणे येथे VIP CAR DRIVER चे प्रशिक्षण आयोजीत करण्यात आलेले आहे. सदरचे प्रशिक्षणा करीता चालक नापोशि/८६८ किशोर अंबुरे नेमणुक पो.स्टे.मालेगांव यांची निवड करुन पाठविण्यात येत आहे.

आदेश क्रमांक पोअवा/आशा-४/बीडीडीएस/-प्रशिक्षण/निवड/नापोकॉ/८३०/२०१७/२४८० वाशिम दिनांक २१/०३/२०१७ अन्वये MIAपुणे येथे बीडीडीएस रिफ्रेशरचे प्रशिक्षण सत्र क्रमांक-६ दिनांक ३०/३/२०१७ ते ०१/०४/२०१७ पावेतो आयोजीत करण्यात आलेले आहे. सदरचे प्रशिक्षणा करीता पोकॉ/८३० संतोष आंभोरे नेमणुक बीडीडीएस पथक वाशिम यांची निवड करुन पाठविण्यात येत आहे.

आदेश क्रमांक पोअवा/आशा-४/सायबर क्राईम/मेघालय/प्रशिक्षण/निवड/पोकॉ-११९२ महेश वानखेडे/२०१७/२५६६ वाशिम दिनांक २१/०३/२०१७ अन्वये दिनांक ३/४/२०१७ ते २९/४/२०१७ पावेतो मेघालय येथे सिसिटीएनएस अँन्ड साबर क्राईम चे प्रशिक्षणा करीता पोकॉ/११९२ महेश अशोक वानखेडे नेमणुक पो.स्टे.रिसोड यांची निवड करुन पाठविण्यात येत आहे.

आदेश क्रमांक पोअवा/आशा-४वाचर्स डयुटी-५/निवड/ सपोउपनि-४७० नरडे/२०१७-२५७३ वाशिम दिनांक २४/०३/२०१७ अन्वये एम.आय.ए.पुणे द्वारा आयोजीत ३ दिवसाचे वॉचर्स डयुटी प्रशिक्षण दि.३०/०३/२०१७ ते ०१/०४/२०१७ पावेतो या कालावधित आयोजीत करण्यात आलेले आहे. सदर प्रशिक्षणा करीता सपोउपनि/४७० नरडे नेमणुक जिवीशा यांची निवड करुन पाठविण्यात येत आहे.

## इतर :-

आदेश क्रमांक पोअवा/आशा-३३-क/अल्पसंख्यांक/प्रशिक्षण/२५६२/२०१७ वाशिम दिनांक २४/०३/२०१७ अन्वये पात्र असलेल्या एकुण-१०० मुला मुलींची पोलीस भरती पुर्व प्रशिक्षण मौलाना आझाद शिक्षण प्रसारक मंडळ वाशिम या संस्थेमार्फत सुरुवात करण्या करीता कळविले आहे. सध्या या आस्थापनेवर दिनांक २२/०३/२०१७ पासुन पोलीस भरती-२०१७ ची प्रक्रिया सुरु असुन नविन पोलीस मुख्यालय वाशिम येथे उमेदवारांचे शारीरीक मोजपाम व मैदानी चाचणी सुरु आहे. त्यामुळे या कार्यालयाचे आस्थापनेवर उपलब्ध असलेल्या जुने पोलीस मुख्यालय वाशिम येथे सदरचे प्रशिक्षण दि.२५/३/२०१७ पासुन सुरु करण्यात येईल. सदर प्रशिक्षणा करीता लागणारे साहित्य व सदर प्रशिक्षण देण्याकरीता पो.मु.वाशिम येथील दोन कवायत निर्देशकासह( १ महिला व १ पुरुष) पुरविण्यात येईल.

आदेश क्रमांक पोअवा/आस्था/पो.शि.भरती/सन-२०१७/२७८३/ वाशिम दिनांक २१/०३/२०१७ अन्वये पोलीस भरती शारीरीक व मैदानी चाचणी घेणे बाबत.१६०० मीटर धावणे,/१०० मिटर धावणे, गोळाफेक/लांब उडी/पुलअप्स/इत्यादी बाबत दिनांक १८/३/२०१७ च्या ज्ञापा सोबत अनावधानाने चुकीच्या गुणांचा तक्ता जोडला गेला आहे. त्या ऐवजी सुधारीत गुणांचा तक्ता विचारात घ्यावा.

आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/पो.अधिकारी/गणवेश अनुदान-२०१७/२४८६ वाशिम दिनांक २१/३/२०१७ अन्वये शासन निर्णय गृह विभाग क्रमांक युएनएफ-०२९०/२५६०(१४)/पोल-४,दिनांक १५/९/१९९२ व पुरक शुध्दीपत्रक क्रमांक युएनएफ-१२०४/२४९२/प्र.क्र.२२/पोल-४ दिनांक ३०/६/२००६ अन्वये खालील नमुद पोलीस अधिकारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे प्रत्येक गटवर्षाचे रु.५०००/-(अक्षरी रक्कम रुपये पाच हजार फक्त) गणवेश अनुदान मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी नांव /नेमणुक | अनुदान घेल्याचे वर्ष | चालु गट वर्ष | वित्तीय वर्ष | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोनि.आर.पी.पाटील पो.स्टे.कारंजा शहर | २०१३-२०१६ | २०१७-२०२० | २०१६-२०१७ | ५०००/- |
| | | | | एकुण | ५०००/- |

सदरचा खर्च सन-२०१६-२०१७ या वित्तीय वर्षात मंजुर २०५५-पोलीस(१०९) जिल्हा पोलीस क-(००)(१) जिल्हा पोलीस दल (सांकेतांक क्रमांक २०५५०१६८) या लेखाशिर्षाखाली मंजुर अनुदानातुन भागविण्यात यावा.

आदेश क्रमांक पोअवा/आथा/परीस्तये प्रशिनि/२४९१/२०१७ वाशिम दिनांक २२/३/२०१७ अन्वये दिनांक २०/३/२०१७ ते दि.२१/३/२०१७ रोजी या आस्थापनेवर महिलां विरुध्दचे अपराध या विषयावरील परीक्षेत्रीय स्तरांवर सेवांतर्गत प्रशिक्षण आयोजीत करण्यात येत आहे सदर प्रशिक्षणा करीता उपस्थीत अधिकारी यांना त्यांची राहण्याची व्यवस्था , चहा जेवणा करीता सेवांतर्गत प्रशिक्षण खात्यामध्ये जमा असलेली रक्कम सेवांतर्गत प्रशिक्षण निधीमधुन( २८-Professional service) रुपये - १५०००/-(अक्षरी रुपये पंधरा हजार फक्त मंजुर करण्यात येत आहे. सदरची रक्कम त्वरीत पोलीस निरीक्षक कल्याण शाखा वाशिम यांना सदर प्रशिक्षणा करीता अदा करण्यात यावे.

आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/पो.अधिकारी/गणवेश अनुदान-२०१७/२५६९ वाशिम दिनांक २४/३/२०१७ अन्वये शासन निर्णय गृह विभाग क्रमांक युएनएफ-०२९०/२५६०(१४)/पोल-४,दिनांक १५/९/१९९२ व पुरक शुध्दीपत्रक क्रमांक युएनएफ-१२०४/२४९२/प्र.क्र.२२/पोल-४ दिनांक ३०/६/२००६ अन्वये खालील नमुद पोलीस अधिकारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे प्रत्येक गटवर्षाचे रु.५०००/-(अक्षरी रक्कम रुपये पाच हजार फक्त) गणवेश अनुदान मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी नांव /नेमणुक | अनुदान घेल्याचे वर्ष | चालु गट वर्ष | वित्तीय वर्ष | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोउपनि बी.एस.कबले श्वान पथक वाशिम | २००९-२०१२ | २०१३-२०१६ | २०१६-२०१७ | ५०००/- |
| | | | | एकुण | ५०००/- |

आदेश क्रमांक पोअवा/आस्थाली/३३-क/सेवानिवृत्ती/पो.कर्म/२४९२/२०१७ वाशिम दिनांक २२/३/२०१७ अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी हे दिनांक ३१/३/२०१७ रोजी वयाचे ५८ वर्ष पुर्ण करीत असल्याने त्यांना नियत वयोमानानुसार दि/३१/३/२०१७ रोजीचे मा.नंतर पासुन या आस्थापेनवरुन सेवानिवृत्त करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सेवानिवृत्त होणारे कर्मचा-यांचे नांव पदनाम/ब.नं. | नेमणुकीचे ठिकाण | सेवानिवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सपोउपनि/३५ प्रकाश आनंदराव खिल्लारे | पो.स्टे.मंगरुळपिर | ३१/०३/२०१७ |
| २ | सपोउपनि/२५८ मो.खालीद मो.शारीफ | पो.स्टे.शिरपुर | ३१/०३/२०१७ |
| ३ | सपोउपनि/१८१ रमेश चिंतामण सरदार | पो.स्टे.धनज | ३१/०३/२०१७ |
| ४ | सपोउपनि/५६४ वसंत मेरसिंग चव्हाण | पो.स्टे.कारंजा ग्रामीण | ३१/०३/२०१७ |

आदेश क्रमांक पोअवा /आशा-४/बीडीडीएस पथक/श्वान पथक/श्वा ान खरेदी/रक्कम मंजुर/२०१७/२५१२/ वाशिम दिनांक २२/०३/२०१७ अन्वये मा. अपर पोलीस महासंचालक गुअवि म.रा.पुणे यांचे आदेशान्वये श्वानांच्या खरेदी करीता त्यांचे कार्यालयाचे प्रतिनिधी व श्वान प्रशिक्षण केंद्राचे प्रतिनिधी तसेच पशुवैद्यकीय अधिकारी यांची समीती गठीत करण्यात आली असुन त्यामध्ये घेण्यात आलेलया निर्णया नुसार तसेच शासनाकडुन राज्यातील विविध घटकांमध्ये १८१ नविन श्वान शरेदीसाठी शासन मान्यता मिहाली असुन श्वान विक्रेत्यांकडुन नविन श्वान खरेदी करण्यासाठी वाशिम जिल्हयातील बीडीडीएस पथका करीता स्फोटक शोधक श्वान-०१ जात लेब्राडोर तसेच श्वान पथका करीता अंमली पदार्थ शोधक श्वान-०१ जात जर्मन शेफर्ड

असे द्वोन श्वान मंजुर करण्यात आलेले असुन एका श्वानांची किंमत रु. २०,०००/-(विस हजार) दर्शविलेली आहे. अशा दोन श्वानांकरीता रु. ४०,०००/-(रु.चाळीस हजार फक्त) तात्पुरत्या स्वरुपात पोलीस कल्याण निधीमधुन मंजुर करण्यात येत आहे.

२/- सदरची रक्कम पोउपनि श्वान पथक तसेच पोउपनि बीडीडीएस पथक यांनी रोखपाल पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम यांचेकडुन रोख स्वरुपात घेवुन दिनांक २४/३/२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता श्वान प्रशिक्षण केंद्र शिवाजी नगर पुणे येथे उपस्थित रहावे.तसेच सदरचे ०२ श्वान खरेदीची प्रक्रीया पुर्ण करुन यवान खरेदी केल्याची बिले तात्काळ या कार्यालयास सादर करावी. सदरची रक्कम सन २०१६-२०१७ चे वित्तीय वर्षामध्ये इतर खर्च या उददीष्टाखाली मंजुर करण्यात येवुन कल्याण शाखेत वळती करण्यात येईल.

(मोक्षदा पाटील)
पोलीस अधिक्षक वाशिम.

प्रति,

संगणक कक्ष प्रमुख पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम यांना माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीस संगणक विभाग नेटवर प्रसिध्दी देणे कामी.

२/- संगणक कक्ष प्रमुख यांनी सदरचे जिल्हा पोलीस गॅझेट अंक हे पोलीस अधिक्षक वाशिम यांचे "संकेतस्थळावर" सर्वा करीता उपलब्ध करुन देण्यात यावे.तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा प्रमुख जिल्हा वाशिम यांचे संकेतस्थळावर "ई-मेल द्वारे" सर्व संबंधितांना माहितीस/सि.बी.-१ लिपीक यांना योग्य कार्यवाहीस.

*****************